# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

## चितार ओळी मेट्रो स्टेशन येथे आता "बुक कॉर्नर" नागरिकांच्या सेवेत झाले सुरु







एयरपोर्ट मेट्रो स्टेशन नंतर चितार ओळी मेट्रो स्टेशन येथे महा मेट्रोच्या वतीने नागरिकांन करिता "बुक कॉर्नर" सुरु करण्यात आले आहे. या ठिकाणी महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद,विनोबा भावे,डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवनावरील तसेच इतर साहित्यिक पुस्तके देखील उपलब्ध आहे.

संती गणेशोत्सव मंडळच्या वतीने या "बुक कॉर्नर" चे पालकत्व स्वीकारण्यात आले आहे. मेट्रो प्रवाश्याना जास्तीत जास्ती मेट्रो रेल प्रकल्पाशी जोडण्याचा महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर यांचा मानस असून असे अनेक उपक्रम त्यांच्या निदर्शनात राबविले जात

आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने मल्टी मॉडेल इंटिग्रेशन,लास्ट माईल कनेटिव्हिटी आदींचा समावेश आहे.

यापूर्वी महा मेट्रोने एयरपोर्ट मेट्रो स्टेशन येथे ज्येष्ठ नागरिकांन करिता विरंगुळा केंद्र खुले केले ज्याला नागरिकांचा चांगला प्रतिसाद आहे या विरंगुळा केंद्राचे पालकत्व विदर्भ साहित्य संघातर्फे स्वीकारण्यात आले आहे.

सदर "बुक कॉर्नर"  पूर्ण पणे निःशुल्क असणार असून या करता सभासद होने बंधनकारक नसेल. नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाशी जास्तीत जास्ती नागरिकांना जोडणे व मेट्रो सेवेचा नागरिकांनी वापर करने हा या मागचा मुख्य उद्देश्य आहे.  "बुक कॉर्नर" सकाळी ८ ते सायंकाळी ७ वाजता पर्यंत नागरिकांन करता खुले राहील.

शहरातील विविध भागात राहणाऱ्या नागरिकांनी सुलभ, सुखकर, सुरक्षित, मेट्रोने प्रवास करून या "बुक कॉर्नरचा" लाभ घ्यावा तसेच शहरातील नागरिक मंडळाने देखील या स्टेशन परिसरातील बुक कॉर्नरचा लाभ घ्यावा तसेच मेट्रो भवन येथील तळमजल्यावर व्हिजिटर्स आणि विद्यार्थ्यांसाठी बनवण्यात आलेल्या विविध उपक्रमांना, प्रदर्शनी बघावे असे आवाहन महा मेट्रोच्या वतीने करण्यात आले आहे.